# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
## अर्थप्रशासन विभाग

---

वाचा: महालेखापाल, नागपूर यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत.

### परिपत्रक

जा.क्र.अप्रवि/वेवले/९२९/२०१६ दिनांक:- २५.८.२०१६

असे आढळुन आले आहे की, या विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजासाठी वेळोवेळी अग्रिम काढण्यात येतात व त्या अग्रीमाचे हिशोब ब-याच उशीराने सादर करुन अग्रीमाचे समायोजन केल्या जाते. वास्तविक पाहता कृषि विद्यापीठ लेखा संहिता नियम क्रमांक ८.११ नुसार अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये तात्पुरता अग्रीम काढण्याची तरतुद असल्याचे स्पष्ट निर्देशित केले असून सदर अग्रिमाचे समायोजन एक महीन्याच्या आत करणे अपेक्षित आहे.

मात्र याबाबत ब-याच प्रकरणी विहीत मुदतीत पूर्तता होत नसल्याने त्या बाबीचा समावेश वार्षिक लेख्यामधे दिसून येतो. त्यामुळे सदरहू बाबींचा मा.महालेखापाल, नागपूर यांच्याकडून प्राप्त अंकेक्षण अहवालामध्ये देखील आक्षेप घेतलेला आहे.

तेव्हा सर्व विभाग प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठ लेखा संहिता नियम क्रमांक ८.११ या नियमांचे काटेकोरपणे अनुपालन करण्याकरीता तात्पुरता अग्रीम आहरित केलेले दिनांकापासुन तीन महिन्याचे आत समायोजित न झाल्यास सदर प्रकरणी जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी यांचेवर संयुक्तीकरित्या निश्चित करुन विद्यापीठ लेखा संहिता प्रमाणे संबंधीतांच्या वेतनातून सदर रक्कम वसुल करण्याची तरतुद स्पष्टपणे नमुद आहे. त्यामुळे सदर प्रकरणी यानंतर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलीपी:

१. कुलगुरुंचे स्विय सहाय्यक, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.
२. कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरीता सादर.
३. विभागप्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी(सर्व), डॉ. पंदेकृवि, अकोला.
४. ______________________________.